## मंगलाबाई भागवत फाऊंडेशन

**वेळ : 2** **भूगोल** **एकूण गुण : 40**

---

**सूचना -** 1) सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

2) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

3) प्रश्न. क्र. 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या भारत/ब्राझील नकाशा आराखड्याचा वापर करुन तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.

4) प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करुन ती पुरवणी मुख्य उत्तर पत्रिकेस जोडावी.

5) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.

6) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.

7) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत. पेन्सिलीने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

8) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिसपेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.

**प्र. 1) अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व लिहा.** **(4)**

i) जगाच्या लोकसंख्येपैकी ............ टक्के लोकसंख्या ब्राझील देशात आहे.

i) २.४१ ii) २.७८ iii) ५.६ iv) १७.५

ii) राजस्थानच्या मैदानी प्रदेशाला ............. म्हणतात.

i) सहारा वाळवंट ii) कलहारी वाळवंट iii) थरचे वाळवंट iv) गोबी वाळवंट

iii) भारतातील ............ राज्यात लोहमार्गांचे विरळ जाळे आढळते.

i) उत्तरप्रदेश ii) महाराष्ट्र iii) राजस्थान iv) मध्यप्रदेश

iv) भारत व ब्राझील या दोन्ही देशांतील राजवट ............. प्रकारची आहे.

i) लष्करी ii) साम्यवादी iii) प्रजासत्ताक iv) मध्यप्रदेश

**प्र. 2) वेगळा घटक ओळखा.** **(4)**

i) ब्रिक्स संघटनेतील सदस्य देश.

i) ब्राझील ii) भारत iii) चीन iv) सौदी अरेबिया

ii) क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश.

i) भौगोलिक ii) ऐतिहासिक iii) मनोरंजन iv) सांस्कृतिक

iii) ब्राझील मधील नगदी पिके

i) कॉफी ii) सोयाबीन iii) रबर iv) मका

iv) ब्राझीलमधील वन प्रकार

i) काटेरी झुडपी वने ii) सदाहरित वने iii) हिमालयीन वने iv) पानझडी वने

**प्र. 3 अ) पुढे दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (फक्त 4)** **(4)**

i) ब्राझीलचे स्थान कोणत्या गोलार्धात आहे ?

ii) भारतातील कोणत्या नद्यांच्या खोऱ्यात दाट लोकवस्ती आढळते ?

iii) गुजरात किनारपट्टीवर कोणती आखाते आहेत ?

iv) सरासरी आयुर्मान म्हणजे काय ?

v) ब्राझीलमधील पर्जन्यछायेच्या प्रदेशाला काय म्हणतात ?

**प्र. 4 अ) तुम्हाला पुरवलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा. तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची तयार करा. (कोणतेही चार)** **(4)**

1) ब्राझीलमधील क्षेत्रफळाच्या दृष्टीने लहान राज्य

2) उत्तरेकडील नागरी लोकसंख्या असलेले राज्य

3) पँटनाल दलदल प्रदेश

4) कोंडोर

5) कटिंगा

6) लोकसंख्येची दाट घनता असणारे राज्य

**आ) पुढील ब्राझीलच्या नकाशाचे वाचन करुन त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.(कोणतेही चार) (4)**




1) भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त कोणते ?

2) भारताचे अतिदक्षिणेकडील टोक कोणते ?

3) भारताच्या दक्षिणेकडील देश कोणते ?

4) भारताच्या मध्यभागातून कोणते अक्षवृत्त गेले आहे ?

5) भारताचे उत्तर-दक्षिण अंतर किती आहे ?

**प्र. 5) पुढील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (फक्त २) (6)**

1) हिमालयातील नद्या बारमाही वाहतात.

2) आंतरराष्ट्रीय पर्यटक ब्राझीलकडे आकर्षित होतात.

3) भारतात अभिसरण प्रकारचा पाऊस कमी प्रमाणात पडतो.

4) ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात लोकसंख्या विरळ आहे.

**प्र.** 6 **अ) पुढील सांख्यिकीय माहितीच्या आधारे बहुरेषालेख तयार करा आणि पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)**

**स्थूल अंतर्देशीय उत्पादनात व्यापाराचा हिस्सा (%)**

| वर्षे | १९७० | १९८० | १९९० | २००० | २०१० | २०१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| भारत | ०८ | १५ | १८ | २८ | ५० | ४० |
| ब्राझील | १७ | २० | १५ | २४ | २५ | २६ |

1) कोणत्या देशाला स्थूल अंतर्देशीय व्यापारातील हिस्सा जास्त आहे ?
2) २०१६ मध्ये भारताच्या स्थूल अंतर्देशीय व्यापाराचा किती हिस्सा होता ?
3) १९८० मध्ये ब्राझीलच्या स्थूल अंतर्देशीय उत्पादनात व्यापाराचा हिस्सा किती आहे ?

**किंवा**

**आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करुन त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)**




1) १९६१ साली नागरीकरण किती टक्के झाले होते ?
2) कोणत्या दशकात नागरीकरण सर्वाधिक होते ?
3) रेषालेख कल पाहता भारतातील नागरीकरणांबाबत तुम्ही कोणता निष्कर्ष काढाल ?
4) कोणत्या दशकात नागरीकरणाची वाढ अतिशय कमी होती ?
5) १९९१ सालच्या नागरीकरणाची टक्केवारी किती आहे ?
6) १९७१ साली भारतात किती नागरीकरण झाले होते ?

**प्र.** 7) **सविस्तर उत्तरे लिहा. (फक्त 2) (8)**

1) पश्चिम घाटाची वैशिष्ट्ये लिहा. ?
2) ब्राझीलच्या हवामानावर परिणाम करणारे घटक लिहा.
3) कृषी क्षेत्रभेटी दरम्यान शेतकऱ्याच्या मुलाखतीसाठी प्रश्नावली तयार करा ?

★★★★★